म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७८४
१८७९

काव्य
७४

# आर[illegible]

ठाणे सन १८९

हें

(कविता बद्ध पुस्तक.)

इंगबी पुराणाच्या आधारानें,

## विनायक परशुराम बाबरे

ह्यांनीं केलें,

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिस्टरकरून ग्रंथ कर्त्यांनें आपला सर्व प्रकारें हक्क ठेविला आहे,)

वसई येथें

"वसईसमाचार छापखान्यांत,,

नं. ९९ ९९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
संग्रहालय क्रमांक ७८४ ७८४
लेखक वि. प. बाबरे
पुस्तकाचें नांव आर[illegible]

[illegible]मगो
गुडाळू
[illegible]न नें इंल[illegible]

ग्रं. काव्य २३३

राव साहेब विनायकराव भास्करजी
मामलेदार तालुका डाहाणू
यांस हें पुस्तक ग्रंथकर्त्या
नें कृतज्ञता पूर्वक
अर्पण केलें
असे

# अश्विनि आख्यान

## बुधजन प्रार्थना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

॥आर्या॥

विद्या तेजें मंडित , पंडित जे बुध गुणज्ञ सज्ञान ॥
त्यांतें विनयें कथितों , द्यावा मत्स्वल्प लेख मान ॥१॥
नाना छंदें वृत्तें , युक्त असी पद्यमालिका केली ॥
सूज्ञें क्षिर निर न्यायें, सेवावी मानुनी शिशू केली ॥
यश द्याया मज लोकीं , बुधजन मानस असो उदाराचिगा ।
जन मन रंजन व्हाया , पद्य रूपें अल्प बुद्धिनें रचिगा ॥ २
कविहों क्षमा असोंद्या , कवित्व पाहुनि करूं नका रोष ॥
विभाक्ति गण मात्रादिक , असतिल मध्यें असंख्यही दोष
बाळावरि जननीचे , बघणे जेवी तिला न म्हणवि पुरे ॥
तत्सम कृपा असावी , जेणें मन्मानसा न भीति उरे ॥ ५

गा
गुडाळ
न नें इंल

# अश्विनि आख्यान

## उपोद्घात

ह्याला **अश्विनिआख्यान** ह्मणण्याचें कारण असें आहे कीं; प्राचीन काळीं **काशी क्षेत्रांत दुर्वास ऋषि नामें** तपोनिधि तपश्चर्या करण्या करितां बसला होता, त्यानें अती उग्र निग्रहता धरून सुमारें दहा हजार वर्षें तपश्चर्या केली. ती अशी कीं, तो जेथें कडासन घालून बसला होता, तेथें त्याच्या आंगावर मातीचें वारूळ चढलें, हाता पांयाचीं नखें मोठ मोठालीं वाढून त्यांच्या गुंडाळ्या वळाल्या, दाढी मिशांचे वगैरे केंस उरावर जाळ्यां प्रमाणे लोंबु लागले; तशाच शिरावर जटाही लांब लांब वाढून त्या त्याच आंगावरून वेली प्रमाणे उतरून खालीं भूमीवर पसरल्या. अशी एकाग्रतेनें त्याची तपश्चर्या चालली असतां "दुधांत विष बिंदु पडून त्याचा बिघाड होतो" त्या प्रमाणें **दुर्वास ऋषीच्या** इंद्रियांस एका एकीं चंचळ पणा येऊन तीं योग साधना तुच्छवत मानून विषयोपभोगाची इच्छा करूं लागलीं; तेणें करून **ऋषीच्या** ध्यान मुद्रेचें सहजच विसर्जन झालें. नंतर लगभगीनें स्वारी उठली, व जटा वगैरे सांवरून आसन गुंडाळून काखेंत मारलें; आणि सर्व सुखाचें आद्यस्थान जें इंद्र भुवन तेथें जाण्याचा निश्चय केला.

इकडे इंद्र सर्व देव ऋषी सह सभेंत बसला असतां, अकस्मात् दुर्वासऋषाची स्वारी आली; ती पाहतांच सर्व देव ऋषी उठून त्यास अत्यादरें आसनावर बसविलें. नंतर इंद्रानें षोडशोपचारें पूजा केली, व क्षुधातुर जाणून षड्रसान्नीं भोजन करविलें. आणि प्रार्थना पूर्वक विचारलें कीं, ऋषीवर्य, काय आपली इच्छा असेल ती निवेदन करावी. ऋषि ह्मणाले, विषयोपभोगाची इच्छा झाल्या वरून योग साधनेचा त्याग करून तुझ्या जवळ आलें आहे हें ऐकून इंद्रानें दिव्य सभा केली, व सेवक पाठवून नृत्य गायन करण्या करितां रंभा, ऊर्वशी, मेनका तिलोत्तमा दि अप्सरांस आणविलें. त्यांहीं नृत्य गायनें हाव भाव नेत्र कटाक्ष युक्त कंदूक केली, इत्यादिकांची धुमाळी उडविल्यामुळें दुर्वासऋषीचें मन लागलेंच दंग होऊन विषयमुद्रेंत गुंग झालें !!! असें पाहून ऊर्वशीला आपले सौंदर्याचा बराच अभिमान झाला. आणि ह्मणते कीं; कायेग रंभे ! हा तपोनिधि ह्मणवितो आणि पहा, कसा माझ्या स्वरूपाला मोहित होऊन विषय लंपटा सारखा [illegible]ंगून गेला आहे ! तरी याला हीं ढोंगें कायगे उपयोग? [illegible] इतकें तप केलें, लांब लांब केश वाढविले, आणि [illegible] सुखाची इच्छा करितच आहे; असें असून हा

त्या विषयांत गम्यही नाहीं; ह्मणून अशांच्या पुढें नृत्य गायन वगैरे करणे हा आपला ही वेडेपणाच आहे !!

अशीं गर्वयुक्त निंदावचनें ऐकून **दुर्वासऋषीला** क्रोध आला, आणि ह्मणाला कीं, जा, मूर्खे तूं मृत्युलोकीं घोडी होऊन फिरसील. असा शाप ऐकतांच **ऊर्वशी** भयाभित होऊन मुनीचे पाय धरून स्तुति करिती झाली. नंतर त्याला दया येउन उश्शाप दिला कीं, तूं दिवसा घोडीचे रूपानें फिरसील, व रात्र होतांच तुला स्त्रीरूप प्राप्त होईल. आणि जेंव्हां **औट** ( साडेतीन ) **वज्रें** एका ठिकाणीं मिळतील तेंव्हां तुझा उद्धार होऊन तूं पूर्व रूपानें आपले ठिकाणी येसील. हें ऐकून तिला अमळ समाधान वाटलें. पुढें ती लागलीच घोडी होऊन फिरत फिरत नेपाळ देशांत जातांच तेथील राजानें पकडून ठेवली. हें **नारद स्वामीला** कळल्या वरून त्यानें **श्रीकृष्णाकडे** कळविली. नंतर **देवानें** राजा जवळ ती घोडी मागितली; त्यानें न दिल्यावरून **कृष्णाला** क्रोध येऊन राजाला मारण्याचा निश्चय केला. राजा घाबरला आणि समुद्राजवळ वगैरे शरण गेला, परंतु कोणीच त्याला आश्रय दि[illegible] नाहीं. मग तो निराश होऊन अरण्यांत जाऊं[illegible]

इतक्यांत **नारदानें** येऊन सांगितलें कीं, राजा तुला मी सांगतों त्या प्रमाणें करसील तर तुझ्या प्राणाचें रक्षण सहज होईल. तूं **भागीरथीच्या** तिरीं जा आणि अग्नीचें कुंड तयार करून घोडी सुद्धां आंत उडी घालण्यास सिद्धहो. इतक्यांत मी जाऊन **सुभद्रेला** कांहीं युक्तीनें तेथें पाठवितों. ती पहातांच तुझें भय निवारण करील. हें राजास खरें वाटून त्यानें अश्विनी सुद्धां जळून जाण्याचा विचार केला. तें **सुभद्रेनें** पाहून त्याला अभय दिलें व **भीमा** जवळ नेलें, त्यानें राजाचा अंगिकार केल्यावरून **देवाचें** व **पांडवाचें** वितुष्ट होऊन मोठें युद्ध झालें. ते वेळीं साडे तीन वज्रें एकत्र होतांच **अश्विनीचा** उद्धार झाला. आणि ती ऊर्वशी होऊन स्वर्गास गेली. यावरून ह्या पुस्तकास **अश्विनी** आख्यान असें नांव ठेवणें भाग पडलें.

**सूचना**—हा वरील कथाभाग **व्यासकृत डंगवीपुराणांत** आहे. त्याच्याच आधारानें पूर्वी कोणी **पांडुरंग** कवी होऊन गेला, त्यानें फक्त **श्लोक, आर्या,** व **केका** युक्त असें **अश्विनी** आख्यान केलें आहे. त्याची मला प्रत [illegible]झाली ती वाचून पाहतां, आंतील कथाभाग फारच गोड [illegible]कारिक असून अप्रसिद्ध आहे. तो प्रसिद्ध करण्याचा

सं. ३।०५
१३३

उद्देश मनांत आणून त्यांत जे काहीं कथेचे संदर्भ तुटले होते ते इंगवी पुराणाच्या आधारानें आंत जोडले. आणि " वरील कवी कडे तर दूषण लावितां येतनाहीं,, परंतु लेखन दोषानें वगैरे कवितेंत छंद भंग झालेला बराच आढळला, त्या कविता सुधारून त्यांतील कांहीं उपयुक्त आर्या, श्लोक, व केका, कायीम ठेविल्या, व बाकीच्यां तील सारांश घेवून जन मन रंजन होण्यासारखीं अनेक छंदाचीं पदें नवीन तयार करून आमच्या प्रियवाचकांस वाचण्या करितां छापून प्रसिद्ध केलीं आहेत.

ग्रंथकर्ता.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
ठाणे.

# अश्विनि आख्यान.

## प्रारंभ

### मंगलाचरण.

॥ आर्या ॥

नमितों गजवदनातें, मानिति प्रियज्या उमासदाशिवहे ॥
देई असावर दासा, विघ्न निरसूनियां सदां *शिवहा ॥ १ ॥
तामरसोद्भवकुमरी†, शिखीवहनारुढ तिला असो नमन ॥
मन्मति प्रकाश व्हाया, स्तवितों तत्पदरजा असो नमन ॥२॥
स्मरतां ज्याचें पदपद्में, निरसे निःशेष दुरित‡ संस्कार ॥
भवबंध मुक्त करिजे, त्या गुरुवर्या असो नमस्कार ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

श्रीमन्मंगल रामनाम बुधहो अत्यादरानें वदा ॥
जेणें प्राप्त यशोधिकाच्युतकथा तारी हरी आपदा ॥

*कल्याण † तामरसोद्भवकुमरीमयुरारुढ सरस्वती. ‡पातक.

पूर्वींचा इतिहास तो शुकपिता वर्णून गेला असे ॥
त्याचें साररसें सुतें कथियलें स्दृष्टांत जें कां नसे ॥४॥

॥ श्लोक ॥

नैडंगवो उपपुराण सुतें कथीलें ॥
तें पांडुरंग कविनें हिपुरा* रचीलें ॥
त्या नंतरें करुनियां सुरसाक वृत्तें ॥ ५ ॥
सुज्ञां पुढें कथि विनायक अल्प मत्तें ॥

॥ आर्या ॥

पूर्वीं द्वापारयुगीं, काशिक्षेत्रीं तपो निधी बसला ॥
नाम दुर्वासमुनी, तपइच्छें त्या स्थळीं बहू वसला ॥ ६ ॥

॥ साकया ॥

अतिनेमें दशसहस्त्रवरुषें तप आचरिलें जेव्हां ॥
शिरीं कचांचा जूट वाढुनी लोंबे अधरीं तेव्हां ॥ ७ ॥
कटासनावरि वारुळ आलें वळल्या नखि गुंडाळ्या ॥
ओंबयाचे केश उरावरि रुळती जणुकां जाळ्या ॥ ८ ॥

॥ ओंवी ॥

करितां ऐसें उग्र तप ॥ गांठीं जोडिलें पुण्य अमप ॥

---

*पूर्वी. केशांचा.

मराठी ग्रंथ संग्रहालय,

तो इंद्रियें केला विक्षेप ।। विपरीत बुद्धि धरीलों ।। ९ ।।

।। साकी ।।

संग तुझा धारिला हें चुकलों मुकलों विषय सुखाला ।।
अजुनी कां *बुक[illegible]सी आशा सोड सोड विट आला ।। १० ।।

।। श्लोक ।।

धरूनि ऐशा दुर्वास नेला ।।
तेचो पथातो दुर्वास नेला ।।
एकाग्रता सोडुनि तेच काळीं ।।
हर्षें उठे वाजवि शिघ्र टाळी ।। ११ ।।

साकी

त्यजुनि कडासन सडाचि उठला विटला जप तप नेमा ।।
मग कुठला तो योगचि सुटला नटला विषयीं प्रेमा ।। १२ ।।

।। आर्या ।।

घे आसन गुंडाळुनि, जायसभे †नाकलोकीं इंद्राच्या ।।
बघतां सुरमुनि उठुनी, लागती चरणीं यया मुनींद्राच्या ।। १३ ।।

।। दिंडी ।।

सुरेंद्रानें आसनि बैसवीलें ।।

---

*बुकया मारिसी । †स्वर्गलोकीं.

पूर्वींचा इतिहास तो शुकपिता वर्णून गेला असे ॥
त्याचें साररसें सुतें कथियलें दृष्टांत जें कां नसे ॥४॥

॥ श्लोक ॥

नेडंगवी उपपुराण सुतें कथीलें ॥
तें पांडुरंग कविनें हिपुरा* रचीलें ॥
त्या नंतरें करुनियां सुरसीक वृत्तें ॥ ५ ॥
सुज्ञां पुढें कथि विनायक अल्प मत्तें ॥

॥ आर्या ॥

पूर्वीं द्वापारयुगीं, काशिक्षेत्रीं तपो निधी बसला ॥
नाम दुर्वासमुनी, तपइच्छें त्या स्थळीं बहू वसला ॥ ६ ॥

॥ साकया ॥

अतिनेमें दशसहस्त्रवरुषें तप आचरिलें जेव्हां ॥
शिरीं कचांचा जूट वाढुनी लोंबे अधरीं तेव्हां ॥ ७ ॥
कडासनावरि वारुळ आलें वळल्या नखि गुंडाळ्या ॥
भोंवयाचे केश उरावरि रुळती जणुकां जाळ्या ॥ ८ ॥

॥ ओंवी ॥

कारितां ऐसें उग्र तप ॥ गांठीं जोडिलें पुण्य अमप ॥

---

*पूर्वी. केशांचा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें ॥ ९ ॥

तो इंद्रियें केला विक्षप्त ॥ विपरीत बुद्धी

॥ साकी ॥

संग तुझा धरिला हे चुकलों मुकलों विषय सुखाला ॥
अजुनी कां *बुकलीतो आम्हा सोड सोड विट आला ॥ १० ॥

॥ श्लोक ॥

धरूनि ऐशा दुर्वास नेला ॥
तेचो पथातो दुर्वास नेला ॥
एकाग्रता सोडुनि तेच काळीं ॥
हर्षें उठे वाजावि शिघ्र टाळी ॥ ११ ॥

साकी

त्यजुनि कडासन सडाचि उठला विटला जप तप नेमा ॥
मग कुठला तो योगचि सुटला नटला विषयीं प्रेमा ॥ १२ ॥

॥ आर्या ॥

घे आसन गुंडाळुनि, जायसभे नाकलोकीं इंद्राच्या ॥
बघतां सुरमुनि उठुनी, लागती चरणीं यथा मुनींद्राच्या॥ १३॥

॥ दिंडी ॥

सुरेंद्रानें आसनि बैसवीलें ॥

---

*बुकया मारिसी । स्वर्गलोकीं.

पुजा उपचारें तया गौरवीलें ॥
पाकशाळे दुतांसि पाठवीलें ॥
तिहीं अन्नादी सिद्ध करवीलें ॥ १४ ॥

॥ आर्या ॥

नानाविधपक्वान्नें, शाखा कोशिंबरी वडे मांडे ॥
पायस दधि घृत मधुनें, भरुनीयां सिद्ध ठेविले हांडे ॥ १५ ॥

॥ ओंव्या ॥

मांडुनीयां ता■ पाट ॥ वाढिलें अन्न खंडी साठ ॥
लावून दीप लखलखाट ॥ मुनी भोजना बैसवीला ॥ १६ ॥
रत्नेंजडीत सुवर्णझारी ॥ ठेविली भरूनी शुद्ध *वारी ॥
देवांगना परोपरी ॥ वाढिती पदार्थ ऋषिवर्या ॥ १७ ॥

॥ आर्या ॥

घे रुचि रुचिनें भुरके, भोजन उरके मुनिंद्र ढेंकर दे ॥
न उरे शक्ति उठाया, मग येउन इंद्र त्या पुढें कर दे ॥१८ ॥
झालें मुख प्रक्षालन, वरि दिधलें तांबुलादि भक्षाया ॥
वारिति चामर व्यजनें, सेवकजे दक्ष‡ पाद रक्षाया ॥ १९ ॥

॥ छंद ॥

सुरपती ह्मणे जोडुनी करा ॥

---

*उदक. ‡धूर्त

जें असे मनीं विदित तें करा ॥
करिन निश्चयें हेतु मी पुरा ॥
धरुनका स्वयें भ्रांतिही नरा ॥ २० ॥

॥ श्लोक ॥

कथिमुनि पुरुहूता वाक्य चित्तीं धरावें ॥
रतिसुख मन इच्छी शांत यातें करावें ॥
ममवय बहु गेलें प्राप्त देहानलेश ॥
विधुमुख* वधु द्याया योग्य तूंगा सुरेश ॥ २१ ॥

॥ दिंडी ॥

†आखंडलें ऐकुनी मुनी बोला ॥
केलि आज्ञा सत्वर सेवकाला ॥
आण रंभादी सभे गायनाला ॥
तिलोत्तमा ऊर्वीश मेनकेला ॥ २२

॥ आर्या ॥

विधुवदना मृगनयना , गजगमना कुशल कोमला चतुरा ॥
इंद्राज्ञेनें आल्या , रतिपथ दावावयासि जा अतुरा ॥ २३ ॥
नर्तन गान सुरंजन , मागद्योतक कवि शिष्ट* उपचारा ॥
दाउनि मुनिमन्मोहिती, चमत्कावितिनयनजेनितलवारा ॥ २४

॥ साकया ॥

बाला मुग्धा मध्या प्रौढा धरुनि स्वरूपें नाना ॥

---

*चंद्रासारखें मुख. †इंद्र. ‡कामोत्पादक. *अनेक

नेत्रकटाक्षें भाव दाविती सुस्वर झोंकिति ताना ॥ २५ ॥

॥ साक्या ॥

मुनिमन मोहित झालें जाणुनि काथि ऊर्वशि रंभेला ॥
ममस्वरूपातें पाहुनियां हा झालागे रंगेला ॥ २६
शिरीं कचांचा जूट बागवी ह्मणवि आपणा योगी ॥
तरि बिषयावरि मनकां दवडी यास काय उपयोगी ॥ २७

॥ आर्या ॥

निंदा वचनें परिसुनि , कोप कल्पांतका मुनी खवळे ॥
गर्वें उर्वशि छळिसी , तरि घेई शाप जो कदां नटळे ॥ २८

॥ श्लोक ॥

मुर्खेगे मृत्युलोकीं हयनिरूपतुला प्राप्त हो याच काळीं ॥
तेव्हां भ्याली मनीते विनवि शुभमुखा हस्त लावी कपाळीं ॥
जीच्या उन्माद केला खरवच* वदलें शिघ्र उश्शाप बोला ॥
जेणें मद्दुःख निरसे बहुसुख निपजे जी तुटे जन्म झोला ॥ २९

॥ अभंग ॥

दया आली दुर्वासाला ॥
तेणें उश्शाप दीधला ॥ ३० ॥
दिवा घोडी रूप होसी ॥
बनामाजी वीचरसी ॥ ३१ ॥

---

*खरवाणी.

सर्व नीघतां यामिनी ॥
होसी सुंदर कामिनी ॥ ३२ ॥
पुन्हा जोडूनियांकरा ॥
पुसे ऊर्वशी सुंदरा ॥ ३३ ॥

॥ श्लोक ॥

प्राप्त:सुरलोक मातें सतत कधि घडेतें वदा वेद रूपा ॥
स्नेहाळू तापसेंद्र द्रवुनि कथि तवाच्छादितों दुःख कूपा ॥
जेकाळीं औट वज्रें मिळति तव तदां होय उद्धार येथें ॥
या वाक्यें स्वस्थ झाली स्तवुनि निजमनीं उर्वशी फारतोषें ॥ ३४

॥ दिंडी ॥

आलें वाजीनी रूप उर्वशीला ॥
फिरूं लागली घोर विपीनाला ॥
निशी होताची वधू रूप तीला ॥
येई ऐशानें बहू काळ गेला ॥ ३५

॥ साकी ॥

फिरतां ऐशी डंगदेशीं नृप उद्यानीं* गेली ॥ ३५
†चार पाहुनी करिति विचारा हीस पाहिजे नेली ॥ ३६ ॥

॥ श्लोक ॥

नेपाळ रानाद्रुत वीरराणा ॥
विख्यात ‡तोक्ष्माधिप सर्व जाणा ॥

*बागेत. †दूत. ‡पृथ्वी पती.

माळी तया सांगत मुख्य चार ॥
आश्चर्य झालें भुवरा अपार ॥ ३७ ॥

॥ केका ॥

पुरी निकट उपवनांत राया बरी ॥
दिवाश्विनि फिरे निश्चित बधु रूप वेगेंधरी ॥
तदां चपळ जाय रायबळ युक्त वेष्टीतसे ॥
ह्मणे त्रयपुरीं विचित्र वडवा अशीकोंनसे ॥ ३८ ॥
कयाकडुनि जायही तरि तयास शासीनरे ॥
सुदक्ष नृपती समग्र मग अश्विनी घाबरे ॥
नृपावरूनची उडे चपळ जाय वेगें वनीं ॥
स्वयेंच मग पृष्ठिसीं फिरत जाय तो काननीं ॥ ३९ ॥
बदां निगिस लागतां सुमुखि होय दिव्यांगना ॥
कारि १स्मित विलोकितां छळि २अनंग रायामना ॥
दिसे ३मृदुल ४शांतकूंभलतिकाच विस्तारिली ॥
समीप नृपये सुहास्य वदना स्वयें बोलिली ॥ ४० ॥
५गतोक्त कथि अप्सरा सुचवि वृत्त राया प्रती ॥
मला सदय रक्षिसी तरि तुझीच होतें सती ॥
दिवाश्विनि तनू निशींत तव ६वल्लभा मी खरी ॥
अनंत सुख पावसी नृप तथास्तु बोले तरी ॥ ४१ ॥

---

१हास्य. २काम. ३सुकुमार ४ सुवर्णवेलीसारखी.
५मागीलकथा ६ स्त्री

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे

॥ श्लोक ॥

गांधर्व लग्नें वरि भूप ते सती ॥
वेश्येसि ये घेउनि तो महीपती ॥
तुरंग शाळेंत दिवा असे वरी ॥
रात्रीस होतां नृप भोगि सुंदरी ॥ ४२ ॥

॥ साकी ॥

ऐसा कांहीं काळ लोटतां नारद स्वामी आले ॥
सयें वंदन करुनी भावें दिव्यासनि बसविले ॥ ४३ ॥

॥ आर्या ॥

इतुक्या माजी अवचित, भूप सदना वाजिनी मुनी पाहे ॥
र्षे पुसे नृपाला, कोठुनियां सांगें आणिली पाहे ॥ ४४ ॥
स्तवितां *प्राचीपतिला, झालें त्याचें तदां प्रसन्न मन ॥
तेणें वडवा दिधली, सांगे नृप मुनीपदा करी नमन ॥ [illegible] ॥

॥ श्लोक ॥

मुनि ह्मणे नृप मन्माति ऐकिजे ॥
हरिसि नेउनियां वडवा दिजे ॥
तुजवरी हरि करील दया वरी ॥
प्रभु सखा करि यावरि लौकरी ॥ ४६ ॥
असें ऐकतां तप्त जैसा ‡महेश ॥

---

* इंद्राला.     ‡ शंकर.

तसा क्षोभला बोलतां डंगवेश ॥
नदेईनमी कायसा कृष्ण थोर ॥
कूटाळाग्रणी जार तैसाचि चोर ॥ ४७ ॥

॥ छंद ॥

ऐकुनी मुनी शिघ्र ऊठला ॥
द्वारकापुरा लागिं चालिला ॥
पाहतां हरी त्यास भेटला ॥
वाणिनी कथा सांगु लागला ॥ ४८ ॥

॥ श्लोक ॥

देवा डंगव देश उत्तरपथीं नेपाल नामि पुरी ॥
तेथें भूप विचित्र नांदतअसे सर्वां नृपांजो धुरी ॥
तद्गेहीं हयमी सुरूप दुसरी उच्चैः श्रवाची *स्वसा ॥
मी त्यातें कथिलें दिजे हरिसही तोनायके कीं असा ॥ ४९ ॥

॥ दिंडी ॥

वृत्त ऐकूनी चित्त होय तृष्ण ॥
तदां प्रेशीता होय दूत कृष्ण ॥
वेति वंदीती चार डंगवेशा ॥
ह्मणति ऐकावी मात गा नरेशा ॥ ५० ॥

॥ आर्या ॥

राया तव सदनीं जे, हयनि असे ते यदुपतीमागे ॥

---

* बहीण.

क्रोधें ह्मणे नदें मी, जावें आल्या पथीं तुह्मी मार्ग ॥ ५१ ॥

॥ सवाई ॥

चार नृपोत्तर सांगति ऐकुनि कोपभरें वदला यदुराणा ॥
आणिन ती वडवा नृप मर्दुनि हा दृढ निश्चय सर्वहि जाणा ॥
जा परतोन नृपास कथा अभिमान फुका नकरीं तनु रक्षीं ॥
व्यर्थ अकीर्ति तुझी जानि होइल आत्महिताहुनि अन्य नलक्षीं ॥५२
येऊन दूत महीवर बोधिति भो क्षितिनायक आग्रह टाकीं ॥
दे वडवा हरिते शरणांगत जा तरितो तुज करुणा भाकीं ॥
हें नरुचे तरिं रक्षि कलेवर कृष्ण अनावर मार्दिल जेव्हां ॥
अश्विनि जीवन राक्षिल तेक्षणीं दूत वचें मध राटती तेव्हां ॥ ५३

॥ सवाई ॥ चाल ॥

जाति चार शब्दसार कृष्णजीस सांगती ॥
डंगवेश घाबरे ह्मणे नसे बरी गती ॥
देत आत्मजास राज्य साश्विनी पळे भयें ॥
धावुनी *नदीपती समीप येत निश्चयें ॥ ५४ ॥

॥ आर्या ॥

जोडुनि कर नृप विनवी, करुणाकर पाहि पाहि शरणातें ॥
प्रगटे सिंधु महामति, नरपति धांवुन धरीत चरणातें ॥ ५५

---

* समुद्र.

पूर्वोक्त त्यास कळवी , सिंधु वदे माधवासीं ना शरण ॥
दे *वडवा आनंदें , केशव चुकवील जन्म सह मरण ॥ ५६
कृतायुगांत भजवीर , कोपुनियां परशुराम वीरगडी ॥
त्र्यंबकधनु ओढुनियां , शर सोडुनि पश्चिमेस मज रगडी ॥५७
दाशरथी विर तैसा , पाहुनि मद्गर्व कोपला नामें ॥
दिधले ममउरीं बहुगिरी , ऐसीं म्या भोगिलीं महा †विषमें॥ ५८
सांप्रत यदुवर दुर्धर , मी नकरीं अंगिकार नृपवर्या ॥
जातूं शरण सुखानें , नाहितरी राहिनाबरीं चर्या ५९

॥ छंद ॥

वासुकीकडे जाय भूपती
पूर्ववृत्त हें त्याजला कथी ॥
दीन मी असें रक्षिजे मला ॥
तों ‡अहींद्र त्या काय बोलिला ॥ ६० ॥

॥ साकया ॥

जोकां आमुचा प्रभु शेष तो आहे कृष्णाधीन ॥
तरित्या विरुद्ध कैसें जावें आह्मिहित्या स्वाधीन ॥ ६१ ॥
बाजींनिजरिहरि मागतसे तरी देउनि हित अचरावें ॥
ऐसेंअहि वचनें नृपमानि शंकुनि बोले कायकरावें ॥ ६२ ॥

---

* घोडी. † संकटें. ‡ मुख्य सर्प.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

॥ आर्या ॥

तेथुनि मग नृप गच्छुनि, कुबेर सदना समीप तो गेला ॥
सकलहि वृत्तांत आपुला, प्रणाम करुनी निवेदित त्या केला ॥ ६३

॥ श्लोक ॥

तो बोले धनपाळ ऐक सखया भांडार मी रक्षितों ॥
कृष्णाचा पद*भृत्यभृत्य म्हणवीं तद्ध्यान मी लक्षितों ॥
मंदा कां बडवार्थ घोर करिसी कृष्णाग दे वाजिनी ॥
जेणे सौख्य अपार होय हरितें ध्याई दिवा यामिनी ॥ ६४

साकी

कुबेरवचनें निराश होउनि भुप कुरुपति सदनाला ॥
जाउन वाजिनि नम्रत्वें त्या वृत्त कथिताझाला ॥ ६५ ॥

॥ दिंडी ॥

वृत्त ऐकूनी कौरवेश बोले ॥
हरी सन्निध आमुचें काय चाले ॥
असे धर्माधीन तो देवराणा ॥
शरण जाई त्या रक्षि तव प्राणा ॥ ६६ ॥

---

* दासानुदास.

॥ श्लोक ॥

ते पांडवाच्युत सखे वरिभात वीर ॥
पंच्यार्क सात्विक बलाढय उदार शूर ॥
तद्वाक्य ऐकुनि रमा वर मान्य होय ॥
सांगीतलें करिसि तूं तरि होय सोय ॥ ६७ ॥
हें ऐकतां तो नरनाथ धांवे ॥
धर्मार्जुना सन्निध शिघ्र पावे ॥
वंदी कथी पूर्व कथा मुखानें ॥
धर्मा करी रक्षण तूं सुखानें ॥ ६८ ॥
बोले धर्म ममाद्य दैवत कुल स्वामी गुरु श्रीपती ॥
माता तात सुव्हृत्सखा सकलतो तूं ऐक राया मती ॥
त्याचे पाद नमों सुखें शरण जा तोषेल नारायण ॥
तेणें सौख्य अनंत पावसि करीं सर्वस्व कृष्णार्पण ॥ ६९ ॥

॥ ओंव्या ॥

धर्मोत्तरें परिसूनकानी ॥
गात्र झाला उदासमनी ॥
जाय कानना लक्षुनी ॥
तों नारदमुनी पातले ॥ ७० ॥
ह्मणे राया धीर धरीं ॥
सांगतों तुज तेंचीकरीं ॥
जाऊन भागीरथीच्या तिरीं ॥
अग्नि सेवाया सिद्धहो ॥ ७१ ॥

॥ आर्या ॥

जातां इंद्र प्रस्थीं, पाठवितां ते स्यळीं सुभद्रेतें ॥
आश्वासुनि ती रक्षिल, *असु निरसुनि क्लेशभीतिनिद्रेतें ॥ ७२
आहेती विर जननी, हरि भगिनी आणि †जिष्णुची जाया ॥
तरि न धरीं भय राया, ऐसी कळ लावुनी निघे जाया ॥ ७३

॥ साकी ॥

विणा घेऊनि नारदस्वामी इंद्रप्रस्थीं गेले ॥
सुभद्रा लयीं प्रवेश करुनी कायबोलतेझाले ॥ ७४ ॥

॥ दिंडी ॥

तुह्मी थोरांच्या स्त्रिया तुह्माला हो ॥
पुण्यमार्गाची नसे कांहिं ‡लाहो ॥
उद्यां हरिदीनी पर्वणी चलाहो ॥
स्नान दानाचा समय पातला हो ॥ ७५ ॥

॥ साकी ॥

जावें भागीरथी तिरीं मग स्नान दान अचरावें ॥
आणिक संकटिं असेल त्यातें अभयें मुक्त करावें ॥ ७६ ॥

---

*प्राण †अर्जुनस्त्री ‡आवड

॥ आर्या ॥

तेणें इह परलोकीं, होउनि सुख जाय प्राणि पुण्यपदा ॥
मानुनि उचित सुभद्रा, भावें मुनितें पुजुनि वंदिपदा ॥ ७७

॥ छंद ॥

डंगवेश हा फार शंकला ॥
त्रास मानुनी शिघ्र चालिला ॥
मांडलें ह्मणे थोर संकट ॥
पावला तदा *स्वर्धुनी तट ॥ ७८ ॥
कल्पितो मनीं †वाजिनि स्तव ॥
सोसुनी तदां हा ‡उपद्रव ॥
अग्निचें महा कुंडपाजळूं ॥
साधिनी उडी घालुनी मळूं ॥ ७९ ॥

॥ केकावली ॥

क्षणी नृपसखोल कुंड वरि काष्ट घाली पहा ॥
तया *ज्वलन लावितांच मग होय मोठा दाहा ॥
तदां प्रखर जाति †व्योमि अति तिव्र अंगारते ॥
नृपाचरण पाहतांचि जन होति त्या वारते ॥ ८० ॥

॥ पद ॥

नारदवचनें निघे सुभद्रा स्वर्धुनि तट लक्षुनी ॥

---

*भागीरथी †घोडी ‡नाश *आग्नि †आकाशीं

हरीदिनि पुण्यकाळ साधुनी ॥ धृ० ॥
दास दासिरथ हयगज सेना सुतासवे घेउनी ॥
पातली नरयानीं बैसुनी ॥
स्नान करूनी शुद्ध मानसें देवाद्विजां पूजुनी
आदरें दानादिक अर्पुनी ॥
यानीं बसुनी जातां पाहे पौरजनां लागुनी ॥
आणि त्यां दूतातें धाडुनी ॥
भा.ब. पुसे जनाला कोण इथें पातलें ॥
हें काय दिसे हो पैल असे चेतलें ॥
कीं, कोणि कुणाचें *कुणुप मधें घातलें ॥
भा.प.ली. जन सर्वहि जें नृपाचरण तें सांगति कर जोडुनी॥
कळवळे मनि अर्जुन कामिनी ॥ नारद० ॥ १ ॥
नारदोक्त स्मृति होउनि राया पुसे काय जाहलें ॥
कशाला घोर कर्म मांडिलें ॥
दिसुनि थोरतूं निंद्य करिसि हें कृत्य दिसेना भलें ॥
असें तरि कोणि तुला गांजिलें ॥
किंवा राज्यासना वरूनी शत्रूनें काढिलें ॥
किं रोगें शारीरासीं नाडिलें ॥
सोबिसि कपिटा तरि संसारीं कां रे मन वीटलें ॥

---

*प्रेत. स्त्री. आग्नी.

कसें हें जग सोडूं वाटलें ॥
ही काय अरीतुन पडलि असेवा भली ॥
कां करुनी घेती आपुली तूंगा धुळो ॥
तरि सांग कथा मज सर्वहि जी आपुली ॥
प०चा० परिसुनि ऐसें वृत्त आपुलें सकळ मुळा पासुनी ॥
कथीलें रायें तिजलागुनी ॥ नारद० ॥ २ ॥
ह्मणे जननितूं काय करोसी त्रिभुवनि मज रक्षिना ॥
नसेंहें जाणे मी परता ॥
सुरां नरां बहु शरणहि गेलो परि तिंहीं मज त्यजितां ॥
दवडिलें वाजिनी वृत ऐकतां ॥
व्यर्थ कासया देह रक्षु मी हे अश्विनि ठेवितां ॥
येईल मृत्यु मला अवचितां ॥
तथापि हें मज उत्तम वाटे करुनी ऐसी चिंता ॥
जळावें धरुनी निष्ठुरता ॥
चा० व० मग पाहुनि निग्रह त्याचा तसा ॥
दे *अश्वासन त्या हरिची ‡स्वसा ॥
मी असतां कां भितोसी असा ॥
प० चा० रक्षिन तुजला कृष्णापासुनि भाक दान घेउनी ।
अथवा युधिष्टिरा सांगुनी ॥ नारद० ॥ ३ ॥
नृप बोले मी धर्मा जवळीं गेलों तेणें मला ॥
कथिलें कां ऐसा भूलला ॥

---

*अभय वचन. ‡बहीण.

अश्विनि देउनि त्या श्रीहरिला करुनी घे आपुला ॥
तरातुं लाभ जगीं जोडला ॥
ते समयीं त्या सन्निध *किरिटी होतागे बैसला ॥
तोही त्याच रितीं बोलिला ॥
ऐसा त्यांचा निग्रह असुनी तेच दाविसी मला ॥
ह्मणुनि हा विचार नोह भला ॥
चा० व० आतां काय करावें कर्माची हे गती ॥
कां ठाव देईना जटरीं मज जगती
करि विलाप ऐसा क्षणोक्षणी नरपती :
प०चा० परशुराम सुत ह्मणे विनायक हरिभक्ता लागुनी ॥
नडेना कांधि संकट येउनी ॥ ४ ॥
नारद वचनें निघ सुभद्रा स्वर्धुनि तट लक्षुनी ॥
हरी दिनि पुण्य काळ साधुनी ॥ ८१ ॥

॥ साकी ॥

अति दुःखित नृप होतां बोले †वज्रपाणि सुत जाया ॥
भीमा सांगुनि वाजिनिसह तुज रक्षिन सत्यचि राया ॥

॥ श्लोक ॥

न ऐके जरी तो तरी मीच जाण ॥
सुता युक्त सेवीत अग्नि प्रमाण ॥

---

*अर्जुन. †अर्जुन स्त्री.

सुभद्रा नृपाचे करीं हस्तमारी ॥
सुखें भूपती *धैर्यकेतू उभारी ॥ ८३ ॥

## आर्या

तैंचि वचन सुभद्रा सूतें, दीधलें तेव्हां नरेशातें ॥
म्हणे तुझिया प्राणातें, रक्षूं आह्मी सकळही ॥ ८४ ॥

## ॥ श्लोक ॥

महिपति कथि मातें धन्य तूं प्राणदानी ॥
हरुनि सकल दुःखें स्वस्थ केलें निधानी ॥
जननि भय न मातें यावरी सत्य वाटे ॥
निरसुनि मम चिंता लाविलें क्षेमवाटे ॥ ८५ ॥

## ॥ आर्या ॥

साध्वी शुभा सुभद्रा, शिघ्र वृकोदर गृहासि ते आली ॥
पूर्वोक्त वृत्त सांगुनी, राया ‡मारुत पदावरीं घाली ॥ ८६
तातें ह्मणे ‡मरुत्सुत, त्वां दिधलें तेंचि मी दिलें वचन
शरणांगत रक्षावा, या कुळ धर्मास हा करूं जतन ॥ ८७ ॥

---

*धैर्य रूप ध्वज. ‡भीम पदावर

कथासुनि रायातें, भीम ह्मणे स्थळ दिलें सुखें रहावें ॥
रात्रीं ऊर्वशिसंगें, काळ क्रमीं अंतरी न भय पावें ॥ ८८ ॥
धर्मास वृत्त कळतां, सांगे भीमा विचार हा न बरा ॥
बारे योग्य न केलें, कृष्णाग्रीं काय चालतो नखरा ॥ ८९ ॥
कुंति वदे *श्रुणु भीमा, हा राजा कलह मूळ कंद दिसे ॥
याचे योगें माधव, अंतरुनी क्लेश युक्त व्हाल पिसे ॥ ९० ॥

॥ साकया ॥

भीम ह्मणे परिसावें माते अभय वचन रायातें ॥
देउनियां मन वदलि सुभद्रा रक्षा शरण ययातें ॥ ९१ ॥
आतां त्यागुन देतां लागे भारत वंशा बोल ॥
होणे तैसें व्हावें सुखें मम चित्त खाइना डोल ॥ ९२ ॥

॥ आर्या ॥

पृथा ह्मणेगा भीमा, ममवचना जरि न मानिसी उचित ॥
तरित्वत्कृत फलभोगिसी, साह्य न तुज बंधु चारि हें खचित ॥

ओवी

परिसूनि ऐसें वृकोदर ॥
ह्मणे करावा लेख सत्वर ॥

---

*ऐक.

होतो वेगळा हा निरधार ॥
नपडे गळां तुमच्या ॥ १४ ॥

॥ आर्या ॥

हा माझा दृढ निश्चय , मत्प्राक्तन मज सुचीत तारील ॥
ज्या आधीं धीर दिधला , त्या स्वकरें कोण धीर मारील ॥ १५

ऐसें वदुनि वृकोदर , सत्वर तो स्वाश्रमाकडे जाय ॥
धर्म ह्मणे न बरें हें , कर्मगती दाविते पुढें काय ॥ १६ ॥

॥ साकी ॥

इकडे कृष्णाला कळलें कीं डंगेश नृप पाशें ॥
भीमें आपुल्या सदनी ठेउनि दिधलें अभय तयातें ॥ १७ ॥

॥ छंद ॥

श्रीहरी ह्मणे फारसा उगा भीम हा धरी मार्ग वाडगा ॥
क्रोध येपरी राहितो उगा जो असे स्वयें * भक्तभाडगा ॥१८

॥ आर्या ॥

हरि मानि विचार करुनी , धाडी शिष्टाई आर्गें मदनाला ॥
वंदन करुनि भीमें, आला तत्काळ धर्म सदनाला ॥ १९

---

*भक्ताचा भुकेला.

॥ अभंग ॥

धर्मा भेटूनीया काम ॥
म्हणे करूं आलों साम ॥ १०० ॥

तुम्ही ठेवीलें रायाला ॥
तेणें देवा कोप आला ॥ १०१

तया सांगे युधीष्टीर ॥
रक्षी त्यातें वृकोदर ॥ २ ॥
आई सांगूं गेली त्याला ॥
परी मानीना तो तिला ॥
जाऊनीयां भीमाघरीं ॥
मदना तूं बोध करीं ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥

उठुनि मदन तेव्हां भीम धामासि आला ॥
मधुरवच सुधेतें वर्षता फार झाला ॥
हरि पद कमळींचा भृंग तूं भीमसेन ॥
त्रिभुवनि तुजऐसा भक्तराणा दिसेना ॥ ५ ॥

॥ आर्या ॥

तातानें कार्थिलें कीं, तवसदनीं अश्विनी असे पांहीं ॥
ती आज्ञा प्रति देईं, त्रयपुरिं बघतां दुजी तसी नाहीं ॥ ६ ॥

॥ साकी ॥

म्हणे वृकोदर व्यर्थ कासया करितोसी या गोष्टी ॥
अतिलोभें पर वस्तु हरितां व्हाल निश्चयें कष्टी ॥ ७ ॥

## आर्या

या तव हरिला सांगे, तूं मागासि परि न देइ मी हयमनी ॥
स्व बळें आग्रह करुनी, दुर्मार्गा जावुं पाहसी नयनीं ॥ ८ ॥
शरणागत भय वाहानि, जे *वडवा रक्षिली किं आजवरी ॥
ती मागतसां तरि म्या, याची हे रीत काय सांग वरी ॥ ९ ॥

॥ श्लोक ॥

बलात्कार योगाल घेतांत कांहीं ॥
अकीर्तिस पावाल संदेह नाहीं ॥
स्वधर्मेंचि मी वर्तलों कृष्ण जाणें ॥
तुम्हा बालका ठाउकें काय गाणें ॥ १० ॥
सारांश मी अश्विनि देतनाहीं ॥
सखास सांगे स्व विचार पाहीं ॥
मनश्चित्त कर्णीं जरि सत्य आहे ॥
तरी मला भीति नसेचि पाहे ॥ ११ ॥

---

*घोडी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

॥ आर्या ॥

ऐकुनि ऐसि प्रतिज्ञा , गेला द्वारावतीसि तो काम ॥
नमुनि ह्मणे ताताला , भामा जवळीं न चाले हो साम ॥ १२

॥ छंद ॥

ऐकतां असें देव कोपला ॥
गर्जुनी तदां बोलु लागला ॥
दुष्टही दशा पांडवां प्रती ॥
आठवे तरी येवि वर्तती ॥ १३ ॥

॥ साक्या ॥

बाहुनि सत्वर स्वामि कार्तिका श्रीहरि वदत तयातें ॥
ससैन्य मेळवीं युद्धालागीं सुर इंद्रादिक यांतें ॥ १४ ॥
त्याचरिती खगपती प्रतीमग यदुपति कथिता झाला ॥
*व्याळ कूळ हें सत्वर आणीं सैन्य युक्त समराला ॥ १५॥

॥ दिंडी ॥

सर्व सन्मुख पातला तदां काम ॥
तया लागीं कथियलें तेचि काम ॥
ह्मणे भूप सर्वही निज धामा ॥

*सर्पकूळ.

आणि घेणे ना यावरी विरामा ॥ १६ ॥

॥ आर्या ॥

आज्ञा होतां आले, वेधार विनायकादि वन्हि यम ॥
नैऋति वरुण पवन शशि, इंद्र भृगु शुक्र ऐकतां नियम १७
धनपत्य *अश्विनि सुनुही, ध्रुवघन गण विश्व देव गंधर्व ॥
पितर द्वादशा दित्य, सप्तार्णव येतियोर रणपर्व ॥ १८ ॥
भगण षडानन गणपति, ससैन्य तो वीरभद्र ही आला ॥
पाताळादि पतींचा, *वृंद समरांगि पावता झाला ॥ १९ ॥
शेषा नंताहि वासुकि, धृतराष्ट्र तसाच पद्मनाभ फणी ॥
कंबल कालिय तक्षक, नववा तो शंखपाळ ये रणी ॥ १२०
आले सप्त कुलाचल, क्षमायादव इष्ट सर्वही राजे ॥
पृतना अपार आली, *विक्रम ऐकूनि शत्रु बहु लाजे ॥ २१
सेना समूह वार्ता, परिसुनि धर्मा मनी भिती वाटे ॥
बारे नकुळा आतां, जाउं तरी सांग कोणत्या वाटे ॥ ११२

॥ साकया ॥

नकुळ ह्मणेजी व्यर्थ कासया स्वमनी धरितां भीती ॥
भूप रक्षणा बहु बल भीमें धारिलें ज्या रिपु भीती २२ ॥
समरि आपणा रक्षक तोची शूर प्रतापे *गदीन ॥

*आश्विनी कुमार. *समुदाय. *पराक्रम. *गदाधारी

आणुनि कौरव मिळवुनियां भूप शत्रु करूं मग दीन ॥ २४

॥ दिंडी ॥

नकुळ वचना मानूनि धर्म राजा ॥
भीति सोडूनी लागे त्याच काजा ॥
गौरवीले आणूनि भीमसेना ॥
म्हणे सकळांतें करा सिद्ध सेना ॥ २५ ॥

॥ आर्या ॥

आज्ञा घेउनि गेला, बंधुकडे गजपुरीसि तो नकुळ ॥
*गांधारा मिष्ट वेंच, वृत कथि व्हा आम्हांसि सानकुळ ॥ २६
कप गुरु कर्ण पितामह, आप्त सुहृज्जनि ससैन्य समरासें ॥
आया साह्य असावें, या समयीं ओळखूनियां नातें ॥ २७ ॥

॥ श्लोक ॥

गेला *माद्रेय मागें †समरक रि ‡पटुता *कौरवेंद्रास भेटे ॥
आमंत्री †संगरार्थी वदत रण तुम्हावीण अन्याय रेठे ॥
तो गेला द्वारकेतें तदुपरि कुरुपति स्वांगनेतें विचारी ॥
जावें कोणाकडे हो स्वमत वदससे तें करूं कर्म नारी ॥
भानामती कौरवनाथ राणी ॥
दुर्योधनातें कथि मिष्ट वाणी ॥

*दुर्योधनास. †नकुळ. ‡ मदन. *त्वरा †युद्धास.

बंधुकडे या समयासीं जावें ॥
जे पांडवांचें हित तें करावें ॥ २९ ॥

॥ आर्या ॥

आला सभे सुयोधन, पुसतो श्रेष्टांस कायहो कीजे ॥
याचारिति पांडव हरी, दोघांतिल पक्ष कोणता धरिजे ॥ ३०
सारे विचार करिती, समार्गी युक्ति सांगतो शकुनी ॥
कृष्णाकडे मिळावें, अमयाचति पंडु सनु आयकुनी ॥ ३१ ॥
*कौंतेय कृष्ण मारिल, अर्पिल तुज राज्य रुक्मिणी कांत ॥
दैवाचा तुं नृपवरा, व्हावा आतां कशास येकांत ॥ ३२ ॥
दुर्योधन सुत लक्ष्मण, ऐकुनि संतापला म्हणे मामा ॥
अष्टावक्रा करिशी, मूर्ख मतीहे सभेसि नये कामा ॥ ३३ ॥
भीष्म द्रोणा नुमतें, होइल तें मानुनी तसे वागूं ॥
राजसभा तुम नेणसी, भाटा सम दुर्जना नको †गांगूं ॥ ३४
मार्गे गमे युधिष्ठिर, आमंत्री त्या कडे सुखें मार्गे ॥
ते रक्षक आम्हातें, आपण या संकटांत समजावें ॥ ३५ ॥
गंगात्मज गुरु मातुल, अश्वथ्यामा कृपादि हे वदती ॥
लक्ष्मण सत्याचे वदला, तीच करावी सुयोधना रीती ॥ ३६

॥ साकी ॥

ऐकुय विचारा करुनी आले धर्म नृपाकडे सारे ॥
*मोठें भेटाती पांडव पतना †वाढुनि काळ पसारे ॥ ३७ ॥

---

*पांडव. †ओरडूं. †आनंद.

॥ श्लोक ॥

आले अंग कलिंग वंग नृपती सेना बहू दाटली ॥
शस्त्रास्त्रीं भट सिद्ध गर्जति मही चोहीं कडे थाटली ॥
तेव्हां कर्ण कथीत शिष्ट कुशल: *श्रीशाकडे धाडिजे ॥
आदौ साम करा नमानिल तरी त्याची चमू ताडिजे ॥ ३८

॥ ओव्या ॥

सभा करूनी युधिष्टीर ॥
पुसे श्रेष्टांतें विचार ॥
शिष्टाई लागीं चतूर ॥
कोण वक्ता धाडिता ॥ ३९ ॥
भिष्म द्रोण कर्ण कृप ॥
आणि कही सर्व नृप ॥
यानुमतें दिव्य रूप ॥
अभिमन्यु हा योजिला ॥ १४० ॥

॥ श्लोक ॥

सामर्थें अभिमन्यु जाय हरितें वंदूनि जोडी कर ॥
सांग पांडव भक्त आप्त तुमचे कां कोपतां त्यां वर ॥
मन्माता बचनासि गुंतुनि नृपा आश्वासिलें हो अम्हा ॥

---

*हर्षें. कृष्णाकडे. सैन्य.

ती आहे तुमची स्वसा उचित जें तें आचरावें तुह्मी ॥ ४१

तुह्मां पांडवां वैर साजे न लोकीं ॥
जरी माय मारी किजे काय *तोकीं ॥
बहू बोधिलें कृष्ण ऐके न वाणी ॥
तमोक्तीं स्वयें बोलतो चक्रपाणी ॥ ४२ ॥

॥ साकया ॥

इंद्रप्रस्थ विदारुनि जाळिन वन्हीनें गजपूर ॥
युद्धीं पांडव ससैन्य कौरव मर्दुनि करिन मि चूर ॥ ४३
भीम भूज कर्वतीन समरीं मारिन माद्री सूत ॥
आणिक फाल्गुन धर्मा निवटुनी दाविन शक्त्यद्भूत ॥ ४४

॥ श्लोक ॥

सौभद्र बोले करितां सुभक्ती ॥
आह्मास तारी तुमचीच शक्ती ॥
परंतु हे पांडव वीर भारी ॥
नलेखिती पातलिया स्मरारी ॥

॥ छंद ॥

जो न पातले वीर भारती ॥

---

*मुलानें.

चाले तों वरी आपुली *रती ॥
प्रत्यय तुह्मां दावितों उद्यां ॥
वाजिनी कथा सोडुनि च द्या ॥ ४६ ॥
देव यादव तुह्मी सात्विक ॥
भूप आणिले भोळे भाविक ॥
त्या तुह्मां नय प्राप्त कोठुनि ॥
घ्याल व्यर्थची सैन्य आटुनी ॥ ४७ ॥

॥ साकी ॥

पहाल आह्मी वीर भारती भीडुं कसे समरांत ॥
जाइल अहिदळ पाताळीं मग धाक सुटेल अमरांत ॥ ४८ ॥

॥ आर्या ॥

मद्वाक्यें कटु वाटतो , परि शेवटिं लागतील जेवि सुधा ॥
ह्मणतां शस्त्राहि नविरां , हीं वचनें मान्य होति केवि बुधा ॥ ४९
सोडा अश्विनी गोष्टी , ना तरी यावें रणांत कदनास ॥
ऐसें बोलुनि नमुनी , *मन्यु गेलास्वकीय सदनास ॥ १५०

॥ दिंडी ॥

धर्मराया सांगतां सकल मात ॥

*पराक्रम. ‡अभिमन्यु.

वीर सारे क्षोभले अंतरांत ॥
झाले सिद्ध लक्षीति युद्ध काम ॥
पौर आले त्यागूनि ग्राम धाम ॥ ५१ ॥
कृष्णनाथें घेवूनि वृंद सर्व ॥
बाह्य आला लक्षूनि युद्ध पर्व ॥
उभय सेना मीळाल्या एक जागीं ॥
वीर सारे गर्जती दोहीं भागीं ॥ ५२ ॥

॥ आर्या ॥

चालति *अग्रि पदाती, जे समरातें उदार धिर गाढे ॥
शस्त्रे झळकति हातीं, घालूं ह्मणताति हो यमा दाढे ॥ ५३
नाना रंगि तुरंगीं, शब्दरवें रण समग्र गाजविलें ॥
जाती समिर गतीनें, दाविति जणुं ते तिहींच माजविलें ॥ ५४
वरि सज्य वीर होते, त्यां करिं आयुधें गदा धनू बाण ॥
तोमर खड्ग दिकजीं, घेणारीं तत्क्षणीं रिपू प्राण ॥ ५५ ॥
धांवति हाका फोडति, तेणे अवघी दणाणिली धरणी ॥
शस्त्र ऊर्ध्व करीती, भासे पवनाहि तोडितील रणी ॥ ५६ ।

॥ साक्या ॥

त्या मागें गज भार चालिले झिकाटत रण रंगीं ।

---

*पुढें.

मराठी ग्रंथ संग्रहालय.
३३ ठाणे.

पृष्ठीं पाखरा रत्नें मंडित शोभति नाना रंगा ॥ १५७ ॥
दंताग्रीं *कलधौत दिव्यसीं †वलयें विराज मान ॥
आकर्षक त्यां पिटितीच नेती जे ‡हरिदंति समान ॥१५८

॥ छंद ॥

पाठिं स्यंदन अमित धडकती ॥
वारु समिरसे जाति भडकती ॥
ध्वजाहि त्यांवरीं भव्य फडकती ॥
चक्रें रथ रथा लागें थडकती ॥ १५९ ॥

॥ आर्या ॥

वीरश्री मद भरुनी, जाती शस्त्रें धरुनियां हातीं ॥
योद्धे उग्र महारथी, परदळ ग्रासावया जणूं पाहती ॥ ६०

॥ दिंडी ॥

कोर्हि मार्गी भूपती कृष्ण धर्म ॥
केति शोभा लक्षाति युद्ध वर्म ॥
वीर वीरां †बाहाति एक मेकां ॥
शंख भेऱ्या त्राहाटीति ते अनेका ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥

तेणें भूउलली १जलार्णव धुमे आकाश वाटे पडे ॥

---

*स्वच्छ. †मिखा. ‡इंद्र हत्ती प्र०. *बोलावती. १समुद्र.

नक्षत्रें गळती गिरी तडकले भंगून जाती कडे ॥
सृष्टी सांवरि कूर्म मेरु कलथे वाराह दंष्ट्रा वरी ॥
विद्युत्पात घडे दिशा धुरटती कल्लोळ ऐशा परी ॥ ६२॥

## दिंडी

वाटे भीती भूचर खेचरांतें ॥
झाला आनंद मनीं नारदांतें ॥
परस्परें भीडीत वीर राजे ॥
द्वंद्व होतांची रण रंग माजे ॥ ६३ ॥

## ॥ आर्या ॥

ब्रह्मा धर्म झगडती, शिव सह देवांत वाढला रंग ॥
भिडती इंद्र सुयोधन, सूर्य द्रोणास जोडला संग ॥ ६४ ॥
गजमुख नकूळ भिडती, षण्मुख भीष्मांत थोर होय रण ॥
तो वीरभद्र कृपभट, समीर कर्णांत योजिती मरण ॥ ६५ ॥
कर्कश रुक्म शकूनी, वैवस्वत लंबपाल वीर गडी ॥
मेघ जयद्रथ दोघे, वासुकि नृप उग्रवर्य चमुरगडी ॥ ६६
बलराम शल्य योद्धे, केसी राजा वृकोदरांत फळी ॥
खवळति मदन घटोत्कच, वाटिव अभिमन्यु झोंबतात बळी ॥
भूरिश्रवा दुःशासन, यादव गण बभ्रुवाहनाख्य विर ॥
भगदंत आणि क्षत्री, कृतवर्मा द्रौणि मांडिती निकर ॥ ६८

---

*समुद्र, पृथ्वीवर व आकाशांत फिरणारे प्राण्यांस.

सात्याकि फाल्गुन पटुभट , ऐसा रण रंग माजला भारी ॥
शस्त्रास्त्रीं रण पंडित , कौतुक पाहे ऊगाचि कंसारि ॥ ६९

॥ श्लोक ॥

झाले एकचि हाक वीर झटती शत्रु शिरें पाडिती ॥
दंष्ट्रा पट्टिश तोमरादिनिकरें मर्मस्थळीं ताडिती ॥
आयुधां सह हस्त जाति तुटुनी घायाळ झाले *भट ॥
ऐसे भीडाति पाय भार गजरें योद्धे बळी उद्भट ॥ १७० ॥

॥ साक्या ॥

तुरंग युद्धीं मिसळाति मारिती खड्ग गदा शर वीर ॥
कित्येक कुंतें मरती परि ते न सोडिती काधिं धीर ॥ ७१
वाजाति खण खण तलवारा बहु हुंबताति विर घायीं ॥
ते मागे रणशूर न सरती कवण्याही ऊपायीं ॥ ७२ ॥

॥ दिंडी ॥

झेंपावले कुंजर भार जेव्हां ॥
रणीं झाला कल्लोळ फार तेव्हां ॥
शुंडे तळीं झोडिती विरां भारी ॥
हकाटूनियां वीर विरा मारी ॥ ७३ ॥

---

*योद्धे.

॥ साक्या ॥

रथि रथि हटाकिति शस्त्रें हाणिति सोडिति सण सण बाण ॥
तट तट शिरकमलें तोडुनियां घेताती रिपु प्राण ॥ ७४ ॥
शरनभि भरेल मंडपा कति व्यापियेल्या दश दीशा ॥
घेघे म्हणूनी विर शर सोडिति त्यजुनीयां जिव आशा ॥७५॥

॥ पद ॥

॥ लावणिचे चालीवर ॥
उभय दळींचे वीर गर्जती हांका देती समरांत ॥
तेणें दिग्गज थरथर कांपति धाक सुटला अमरांत ॥ ध्रु ॥
कोणाचे रथ अंबरिं उडावति पाचारिति ते परस्परां ॥
कोठें स्यंदन रीक्त धांवती मारियले रथि एकसरां ॥
कित्येक रथि गगनांत जाउनि सोडिति तेथुनि अमित शरा
चोंप मोडिति शीत तोडिती बाणा ताळें झोडीति विरां ॥
सण सण सण सण सायक सोडिति झालि धुमाळी बहु त्यांची ॥
तों रणरंगीं हांक गाजली एकाचि रणनायक यांची ॥
शरां निकट किति अंध जाहले उडति कबंधें वीरांची ॥
पांय भार गजवाजि मारिले वाहे सरिता रुधिराची ॥
होतां ऐसें यृद्ध जाहला कृष्ण दळामधें आकांत ॥
विर हटलेते पळतचि सुटले त्यांफिरवी रेवाति कांत ॥ १
उभय दळींचे वीर गर्जती हांका देती समरांत ॥
तेणे दिग्गज थरथर कांपति धाक सुटला अमरांत ॥ ७६ ॥

## ॥ आर्या ॥

धांवे सांव शरणीं , हलधर घे मुसळ गरगरां फिरवी ॥
ओढी *हलें वळें वीर , झोडी मुसळें करां शिरां नुरवी ॥ ७७
देवहि समरा उठले , मग कुठले तगाति कौरवादि भट ॥
हटले तिहि रथ पिटिले , दुर्मार्गे सोडुनी पथा सुभट ॥ ७८ ॥

## ॥ श्लोक ॥

झाले ते पांडवादी चकित भट रणीं थोर आकांत झाला ॥
मागें सेना फिरती निरखुनि बळिया भीम धावून आला ॥
त्यावी वीरश्रियेनें †रदन कडकडां त्यागिलें स्यंदनातें ॥
धांवे पायीं बलाढ्य स्वचमु परतवी मांडिलें कंदनातें ॥ ७९

पदाती वरी आपटी अश्वभार ॥
रथ्यांचे शिरीं वारणाचा प्रहार ॥
नभीं झोकिले प्रेत भारे गजांचे ॥
गदेनें रणीं चूर्ण केलें रथांचें ॥ ८० ॥

तेणें कृष्ण दळें भयें मुरडलीं गेले बिळीं ते अही ॥
देवांचे गण यादवादि नृपती माघारले सर्वही ॥
तों ज्ञाले रणशूर भीष्म कृपही द्रोणार्जुनादित्यज ॥
द्रौणी माद्रिसुतादिमन्यु शकुनी गांधारिचे आत्मज ॥ ८१

---

*नांगरानें †दांत

## ॥ आर्या ॥

द्रौपदि पुत्र घटोत्कच , धांवे तो बभ्रुवाहनाख्य बळी ॥
शैल्य जयद्रथ आले , युद्धाची मानशी अपार फळी ॥ ८२ ॥
पवनास्त्रं वज्रास्त्रं , अग्न्यस्त्रं सोडिती अनंत रणीं ॥
देवास्त्रं ब्रह्मास्त्रं , सुटतां कंपे थरारिली धरणी ॥ ८३ ॥
वाजति गदा हि खणखण , सण सण सण सुटति बाण हे समरीं ॥
भारति वीर विलोकुनि , गणिलें आश्चर्य यादवीं अमरीं ॥ ८४
तेव्हां कृष्ण उसळला , घेत करीं चक्र गरगरां फिरवी ॥
तेज भरे त्रयभुवनीं , भासे कीं उगवले अनंत रवी ॥ ८५ ॥

## साक्या

क्रोधें हरि भ्रू वक्र करूनी दावि जनां बहु क्षोभ ॥
तेणें जरि त्रिभुवन भ्यालें तरि कुंति सुतां कडे लोभ ॥ ८६
वर भरला उर्वशिचा ह्मणुनी योग माधवें केला ॥
चित्तीं त्याच्या असे क्षमापरि कोप दावि सेनेला ॥ ८७

## पद

मजला वरिल सुभद्रा काय या॰ चा॰
भवीष्य जाणुन श्री हारिनें चक्र करीं धरिलें ॥ भवीष्य॰ ध्रु ॥
वर हा उर्वशिचा भरला हें कळुनीं आलें त्याला
यास्तव आपण समराला चालीला घोर रणीं ॥ भ॰ १ ॥

अंतरि पंडुसुतां कडे प्रीत परि दावी क्रोधाची रीत !!
तेणें होय चमू भयभीत न उरे स्थीत देहाची ॥ भ० २ ॥
स्वभक्त कीर्ति रवि उदयास यावा हेंचि असे मनी खास ॥
ना तरि पांडव कौरव यांस जिंकायास वेळ किती भ० ३ ॥
भक्तिबळें जरि हरि धरिती तरि होइल वश शिघ्रगती ॥
समरीं गाठूंल्या ह्मणती ते मुकती प्राणातें ॥ भ०श्री०चें ॥ १८८

॥ पद ॥

[ कोण कुठिल तूं चोर जार कीं. या० चा० ]

श्रीहरि करिंच चक्र पाहुनी झाली चमु सारी————
भयाभित झाली चमु सारी० ॥ धृ० ॥
दोंहि दळीं आक्रांत जाहला हीमज्वर सकळांतें भरला ॥
विरां अंगीं कंप सुटला रक्षीं कैसारी ॥
प्रभा हे संकट निवारी श्रीहरि करिचें चक्र पाहुनी० ॥ १ ॥
चक्र प्रभेनें उभय चमूंचे नयन झांकले मार्ग न सूचे ॥
पढती स्तोत्रें पांडव वाचे ह्मणती पुतनारी ॥
कृपा करीं दासांतें तारी श्रीहरि० ॥ २ ॥
बुध मुनि स्तविती भाकुनि करूणा पांडव रक्षी तो यदुराणा ॥
पार न ज्याचा वेदपुराणा त्रिभुवन अधिकारी ॥
आहे तो भक्तां कैवारी श्री० ॥ ३ ॥
डंगवेश नृप बहु घाबरला नम्रत्वें कथितो भीमाला ॥

दिसतो तुमचा नाश मजला अश्विनी देई तरी ॥
करुनिघे अपुला मुरारी ॥ श्री० ॥ १८९ ॥

॥ आर्या ॥

हासुनि भीमाश्वासी, ह्मणे नृपा क्षणभरी धरीं धीर ॥
चक्राचें भय न गणी, पाहें हे भारती कसे वीर ॥ १९० ॥

॥ साकी ॥

बोलुनि ऐसें गदा घेउनी धावे कुंतिचा बाळ ॥
गडबडली हरि *वाहिनि ह्मणती आला जणु हा काळ ॥ ९१

॥ आर्या ॥

अनुकंपायुक्त असे, हरि सोडी हातिंच तदां चक्र ॥
दचकले विधिहरपन्नग, सुरभूवर चकित जाहला †शक्र ॥ ९२
आले चक्र सुसाटें, पांडव पृतनेंत तों पडे धाक ॥
ते समयीं भीमानें, गर्जुनि समरांत फोडिली हांक ॥ ९३ ।

॥ छंद ॥

भवडुनी भिमें झोंकिली गदा ॥
वरिच लागली झोंबिही तदां ॥

*सेना †इंद्र

दोन्हि आयुधें हटति ना कदां ॥
शमित वर्षल्या अग्नि एकदां ॥ १४ ॥

॥ साक्या ॥

जिकडे शस्त्र कलयति तिकडे घन वर्षे *कपिटाचा ॥
सोडिल झोंबो ऐसा न दिसे बळि कोणी सुतपाचा ॥ १५
नभि खण खणख शस्त्रें गर्जति शंभु ह्मणे कंसारी ॥
अर्जुनी स्वमनीं विचार करुनी मागें सुदर्शन सारी ॥ १६

॥ आर्या ॥

हे वीर भक्त निधडे , पृतना ह्या त्यांपुढें जसीं बकरीं ॥
कां प्रळयातें करिसी , वारीं चक्रास अंत हा न करीं ॥ १७

॥ श्लोक ॥

श्रीकृष्ण इच्छी पवनात्मजातें ॥
तो येत वंदी पदपंकजातें ॥
सांगे हरी सोडवीं शस्त्र युद्ध ॥
दोन्ही धरी धावुन तो प्रबुद्ध ॥ १८ ॥

---

*अग्नि इंद्र

॥ पद ॥

[ गडय्यानो कृष्ण गडी या० चा० ]

स्वबळें अंजानि बाळाला न सुटे शस्त्र मिठी त्याला ॥ धृ०
उडुनी अंबरिं अयुधातें धरितां झोंबाति हस्तातें ॥
करितां उपाय सुटण्यातें परि झेंपाविति तीं त्यातें ॥
खाउनि झोंके बहु श्रमला न सुटे० ॥ स्व०॥ १ ॥
पाहुनियां त्रय वज्रांसीं वाटे नवल श्रीहरिसीं ॥
वर ऊर्ध्वशिचा उदयासीं आला कळलें हें त्यासीं ॥
झाला विस्मय देवाला न सुटे० ॥ स्व० ॥ २ ॥
मग हरि पाचारी भीमा नकळे ज्याची बळ सीमा ॥
तो ये मनि धरुनि प्रेमा वंदी श्रीधर पद पद्मा ॥
भक्ति बळें प्रभु वश झाला ॥ न सुटे० ॥ स्व० ॥ ३ ॥
भव्य गदा जी भीमाची तिजला शक्ती वज्राची ॥
तेच असे त्या चक्राची आणिक *पवनात्मज याची ॥
ह्मणती त्रय वज्रें ह्याला विनायक हरि पादिं लिन झाला ॥
स्वबळें अंजानि बाळाला न सुटे शस्त्र मिठी त्याला ॥ १९

॥ साकी ॥

भीमा त्व तनु अर्ध वज्र तूं जा वश तुजला आहें ॥

---

*मारुती

आंटे वज्र भिडि मिळतां येइल सत्याचि यश तुजला हें ॥ २००

॥ दिंडी ॥

शाप मुक्ती होईल ऊर्वशीला ॥
उद्धरूनी जाईल ती स्थळाला ॥
नव ख्याती रूप ध्यजा रोपणाला ॥
हाचि जाणे वा सुदिन असे आला ॥ २०१ ॥

॥ छंद ॥

ऐकतां असें भीम तोषला ॥
जाउनी गदे हस्त घातला ॥
श्रीहरि करें चक्र फीरलें ॥
तेंकरांबुजीं शिघ्र घेतलें ॥ २ ॥
वज्र युद्ध हें सूटलें तदां ॥
सुख जाहलें गेलि आपदा ॥
पंडु यादवां *नृपपुंगवां ॥
वाटला बहू हर्ष ते धवां ॥ ३ ॥

॥ आर्या ॥

तत्काळचि हयनांचें, पालटुनी रूप ऊर्वसी झाली ॥

*नृपश्रेष्ट

…ाला ॥

॥ पद ॥

[ गड्यानो कृष्ण गडी या० चा० ]

स्वबळें अंजनि बाळाला  न सुटे शस्त्र मिठी त्याला ॥ धृ०
उडुनी अंबरिं अयुधातें  धरितां झोंबति हस्तातें ॥
करिता उपाय सुटण्यातें  परि झेंपाविति ती त्यातें ॥
खाउनि झोंके बहु श्रमला  न सुटे० ॥ स्व०॥ १ ॥
पाहुनियां त्रय वज्रांसीं  वाटे नवल श्रीहरिसीं ॥
वर ऊर्ध्वशिचा उदयासीं  आला कळलें हें त्यासीं ॥
झाला विस्मय देवाला  न सुटे० ॥ स्व० ॥ २ ॥
मग हरि पाचारी भीमा नकळे ज्याची बळ सीमा ॥
तो ये मनि धरुनि प्रेमा  वंदी श्रीधर पद पद्मा ॥
भक्ति बळें प्रभु वश झाला ॥ न सुटे० ॥ स्व० ॥ ३ ॥
भव्य गदा जी भीमाची  तिजला शक्ती वज्राची ॥
तेच असे त्या चक्राची  आणिक *पवनात्मज याची ॥
ह्मणती त्रय वज्रें ह्यांला विनायक हरि पादिं लिन झाला ॥
स्वबळें अंजनि बाळाला न सुटे शस्त्र मिठी त्याला ॥ १९

॥ साकी ॥

भीमा त्व तनु अर्ध वज्र तूं  जा वश तुजला आहे ॥

---

*मारुती

औंट वज्र मिठि मिळतां येइल सत्याचि यश तुजला हें ॥ २००

॥ दिंडो ॥

शाप मुक्ती होईल ऊर्वशीला ॥
उद्धरूनी जाईल ती स्थळाला ॥
नव ख्याती रूप ध्वजा रोपणाला ॥
हाचि जाणे वा सुदिन असे आला ॥ २०१ ॥

॥ छंद ॥

ऐकतां असें भीम तोषला ॥
जाउनी गदे हस्त घातला ॥
श्रीहरि करें चक्र फीरलें ॥
तेंकरांबुजीं शिघ्र घेतलें ॥ २ ॥
वज्र युद्ध हें सूटलें तदां ॥
सूख जाहलें गेलि आपदा ॥
पंडु यादवः *नृपपुंगवां ॥
वाटला बहू हर्ष ते धवां ॥ ३ ॥

॥ आर्या ॥

तत्काळचि हयनाचें, पालटुनी रूप ऊर्वसी झाली ॥

*नृपश्रेष्ट

...ताला ॥

स्वरूपा भरणें युक्तसो , सैन्य समूहा समीप ते आली ॥ ४

॥ साकया ॥

जोडी पाणी करी विनवणी बघुनी सुरनृप *श्रेणी ॥
या या मम उद्धार परवणी घडली आपुली येणी ॥ ५ ॥
आतां सारे सैनिक हो तह्मी लोभ वृद्धि ठेवावी ॥
आणिक स्वालयीं जाया मजला अपुली आज्ञा व्हावी ॥ ६

॥ आर्या ॥

तों स्वर्गा वरूनीये, वाजत घंटा विमान धराणि वरीं ॥
त्या माजी वसुनीते, सुर ललना गेलिं शिघ्र इंद्रपुरीं ॥ ७ ॥

॥ छंद ॥

झालि ऐक्यता कलह मीटला ॥
द्वैत भावही समुळ लूटला ॥
उभय सैनिका हर्ष वाटला ॥
स्तविति माधवा प्रेम दाटला ॥ २०८ ॥

दिंडी

आला नेपाळधीप हरी पासीं ॥
स्तुती करूनीया जोडि कर त्यासीं ॥

---

*पंक्ति

अभय देऊनी गोपिका विलासी ॥
म्हणे जाईंगा सुखें स्वस्थळासीं ॥ ९ ॥

॥ साकी ॥

भावें पांडव कौरवादि नृप यदुपति स्तवन करीती ॥
श्रीहरि आलिंगन दे त्यांते प्रेम चरण धरीती ॥ २१० ॥

## कटाव

हरि इच्छें खगपति आला भावें तो नमिता झाला ॥ धृ०
देव म्हणे पाताळा जावें अमृत घट घेउनियां यावें ॥
तेणें मृत दळ साजिव करावें उभय सैनिका सौख्यचि व्हावें ।
आज्ञा होतां सुपर्ण गेला घट घेउनि सहजचि तो आला ॥
कृष्ण करांबुजिं देता झाला सिंचन करितां सैन्य ऊठलें ।
संशय मनिचे समुळ फीटले मृत्यु जरा भय सकल तूटलें ॥
हारिस्तवनातें अवघे झटले आज्ञा घेउनि जाया नटले ॥
सर्वे घेउनि गज रथ सेना सुरनर गेले अपुले स्थाना ॥
पांडव पढती स्तोत्र नाना पारनज्याचा वेद पुराणा ॥
तो यदुराणा होय रक्षिता आमुचे प्राणा ॥
परिसुनि देवा आली करुणा अभय देउनी पंडु सुतांला ॥

निघुनी गेला द्वारावतिला पांडव आले निज नगराला ॥
ह्मणति आपणा कृष्ण पावला तेणेची हा सुदिन दाविला ॥
हरिइच्छे खगपति आला भावें तो नमिता झाला ॥ २११ ॥

॥ आर्या ॥

हे अश्विनी कथा जे , गाती परिसति तयांवरी श्रीहरी ॥
करूनी कृपावलोकन , निरसुनि विघ्नें रिपू विर श्रीहरी ॥१२२
चिचाणि ग्राम निवासी , ह्मणती बावरे विनायक हो
सुत परशुराम येंण , कथिली कथा स्मरुनि बुद्धि नायकहो २१३

## ॥ समाप्त ॥